MHKO070000372026

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४/२०२६ मधील**

**नि.क्र.१ वरील आदेश**

**(सविता बाळासो भंडारे आणि इतर वि. कोणी नाही.)**

प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसा दाखला मिळण्याकरीता दाखल करण्यात आला आहे.

०२. अर्जदारांच्या म्हणण्यानुसार अर्जदार क्र.१ यांच्या सासू व अर्जदार क्र.२ यांची आजी कै.जनाबाई गोपाळ भंडारे (लग्नानंतरचे नाव) जनाबाई केशव पांडव (लग्नापुर्वीचे नाव) ह्या दि.०२/१२/२०२२ रोजी शिरटी, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर येथे वृध्दापकाळामुळे मयत झालेल्या आहेत. तसेच, अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ यांचे वडील कै.बाळासो गोपाळ भंडारे हे दि.१९/११/२०२४ रोजी शिरटी, ता. शिरोळ येथे मयत झालेले आहेत. तसेच, अर्जदार क्र.१ यांचे सासरे व अर्जदार क्र.२ यांचे आजोबा व मयत जनाबाई गोपाळ भंडारे (लग्नानंतरचे नाव) जनाबाई केशव पांडव (लग्नापुर्वीचे नाव) यांचे पती गोपाळ बाबू भंडारे हे दि.२६/०५/२००६ रोजी वसंतदादा शासकिय दवाखाना, सांगली येथे मयत झाले आहेत. अर्ज प्राप्त झाल्यानंतर दि.२४/०१/२०२६ रोजीच्या 'दैनिक महानकार्य' या वर्तमानपत्राद्वारे आक्षेप मागविण्यात आले होते. तसेच जाहीरनामा काढण्यात आलेला होता. मात्र अर्जदारांच्या मागणीबाबत कोणीही आक्षेप घेतलेला नाही.

०३. कै.जनाबाई गोपाळ भंडारे (लग्नानंतरचे नाव) जनाबाई केशव पांडव (लग्नापुर्वीचे नाव) यांना अर्जदार यांचेशिवाय अन्य कोणीही सरळ व कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना महसुल दप्तरी कामाकरिता वारसा दाखल्याची आवश्यकता आहे व तसा दाखला घेणेत यावा असे महसुल दप्तरी वारस दाखल्याची मागणी केल्यामुळे सदरचा अर्ज यातील अर्जदार यांना दाखल करणे भाग पडलेले आहे.

०४. अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री.जे.एन.पाटील यांचा युक्तिवाद ऐकला. अर्जदारांचा अर्ज, अभिलेखावरील पुरावे व युक्तीवाद करता माझेसमक्ष खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. त्यांची उत्तरे व त्याकरीता आवश्यक कारणमिमांसा मी पुढीलप्रमाणे करते–

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार हे मागणी केल्याप्रमाणे वारसा दाखला मिळणेस पात्र आहेत काय ? | :- | होकारार्थी |
| २. | काय आदेश ? | :- | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र. १ व २ करिता :-**

०५. अर्जदारांनी आपल्या म्हणण्याच्या पृष्टयर्थ खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा सादर केले आहेत.

| अ. क्र. | दस्तऐवजाचे नांव | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १ | अर्जदार क्र.१ श्रीमती सविता बाळासो भंडारे यांचे सरतपासाचे शपथपत्र. | १० |
| २ | मयत जनाबाई गोपाळ भंडारे यांचा मृत्युदाखला | ११ |
| ३ | मयत बाळासो गोपाळ भंडारे यांचा मृत्युदाखला | १२ |
| ४ | मयत गोपाळ बाबू भंडारे यांचा मृत्युदाखला | १३ |
| ५ | दिनांक ०६.०५.२०२५ रोजीचा ग्रामपंचायत, शिरटी यांचेकडील दाखला | १४ |
| ६ | मे. कार्यकारी दंडाधिकारीसाो, शिरोळ यांचेसमोर केलेले अर्जदार क्र.१ यांचे प्रतिज्ञापत्र | १५ |
| ७ | अर्जदार क्र.१ यांच्या आधारकार्डची पडताळलेली प्रत | १६ |

| अ. क्र. | दस्तऐवजाचे नांव | निशाणी क्र. |
|---|---|---|
| ८ | अर्जदार क्र.२ यांच्या आधारकार्डची पडताळलेली प्रत | १७ |
| ९ | जाहिर नोटीस प्रसिध्द केलेली दै. महानकार्य, दि. २४/०१/२०२६ रोजीची प्रत. | ०६ |
| १० | पुरावा बंद केलेबाबतची पुरसीस. | १८ |

०६. अर्जदारांच्या मागणीप्रमाणे दि.२४/०१/२०२६ रोजी दै. महानकार्य वृत्तपत्रामध्ये जाहिर नोटीस (नि.क्र.६) काढण्यात आली. जाहीरनाम्याची एक प्रत (नि.क्र.७) मयताच्या घराच्या दर्शनी ठिकाणी, तसेच एक प्रत गावचावडी नोटीस बोर्डवर, तसेच एक प्रत ऑफीस नोटीस बोर्डवर प्रसिध्द करुन बेलिफ रिपोर्ट दाखल केलेला आहे. या जाहिरनाम्याच्या व जाहिर नोटीसीच्या प्रसिध्दीनंतर देखील अर्जदार हे मयत जनाबाई गोपाळ भंडारे (लग्नानंतरचे नाव) जनाबाई केशव पांडव (लग्नापुर्वीचे नाव) यांचे वारस नाहीत, अशी तक्रार कोणीही आजतागायत उपस्थीत केलेली नाही.

०७. अभिलेखाची पाहणी करता असे दिसते की, कै.जनाबाई गोपाळ भंडारे ह्या शिरटी, ता. शिरोळ जि. कोल्हापूर येथे दि.०२/१२/२०२२ रोजी मयत झालेल्या आहेत. मयत बाळासो गोपाळ भंडारे हे दि.१९/११/२०२४ रोजी व मयत गोपाळ बाबू भंडारे हे दि.२६/०५/२००६ रोजी मयत झाले आहेत.

०८. अर्जदार क्र.१ यांनी याकामी आपले सरतपासाचे प्रतिज्ञापत्र (नि.क्र.१०) दाखल केलेले आहे. अर्जदार क्र.१ यांचा त्यांच्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रातील मजकूर हा अर्जातील कथने व दाखल कागदपत्रे यांचेशी पूर्णपणे सुसंगत आहे. अर्जदार यांच्या या अर्जातील कथनांना कोणीही आव्हानीत केलेले नाही. अर्जदार यांनी नि.१४ व १५ ला दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, जनाबाई गोपाळ भंडारे यांचे लग्नापूर्वीचे नाव जनाबाई केशव पांडव असे असल्याचे दिसून येते. तसेच, नि.१४ च्या दाखल्यामध्ये जनाबाई गोपाळ भंडारे व जनाबाई केशव पांडव ह्या दोन्ही नावांच्या व्यक्ती एकच असल्याबाबतचा दाखला ग्रामपंचायत, शिरटी यांनी दिलेला आहे. अर्जदार हे मयत जनाबाई गोपाळ भंडारे (लग्नानंतरचे नाव) जनाबाई केशव पांडव (लग्नापुर्वीचे नाव)

यांचे वारस असल्याची बाब वादातीत नाही. अशा प्रकारे अर्जदार हे मयत जनाबाई गोपाळ भंडारे (लग्नानंतरचे नाव) जनाबाई केशव पांडव (लग्नापुर्वीचे नाव) यांचे कायदेशीर वारस असल्याची बाब सकृतदर्शनी स्पष्ट होते. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. २ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

:: **आ दे श** ::

१} अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२} अर्जदार हे मयत जनाबाई गोपाळ भंडारे (लग्नानंतरचे नाव) जनाबाई केशव पांडव (लग्नापुर्वीचे नाव) यांचे वारस आहेत, असा वारसा दाखला अर्जदार यांनी योग्य ते न्यायालयीन शुल्क भरल्यावर प्रदान करणेत यावा.

VANITA
Digitally signed by VANITA
Date: 2026.03.10 16:40:24 +0530

(व्ही. एम. कोळेकर)

ठिकाण : जयसिंगपूर
दिनांक : १०.०३.२०२६

३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.